INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# आंबेडकरवादी गीतकार: वामनदादा कर्डक

**प्रा.डॉ. गोपीनाथ बोडखे**
आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय,
कडा, ता. आष्टी, जि. बीड
E-mail: bodkhegp2014@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/11.2021-49613253/IRJHIS2111020**

**प्रस्तावना :**

वैभवशाली सांस्कृतिक वारसा लाभलेली महाराष्ट्राची भूमी. सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि धार्मिक जीवनाचा इतिहास इथे स्वतंत्रपणे घडत गेला. याच महाराष्ट्राच्या भूमीमध्ये वामनदादा कर्डकांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यामध्ये देशवंडी गावी १५ ऑगस्ट १९२२ साली झाला. आई सईबाई व वडील तबाजींच्या पोटी हे पुत्ररत्न प्राप्त झाले. वामनदादा तीन वर्षाचे असतांना त्यांच्या वडीलांचे निधन झाले. लहानपणी गुरे राखण्याचे काम त्यांना करावे लागले. वयाच्या अकराव्या वर्षी मुंबईमध्ये गिरणी मजूर असलेल्या भावाकडे ते गेले. कोळसा वखारीत कोळसा वेचण्याचे व विकण्याचे काम त्यांनी केले. नंतर त्यांना गिरणीत नोकरी मिळाली. समता सैनिक दलात लेजीम व काठीचे प्रशिक्षण त्यांना मिळाले. एके दिवशी त्यांना निरक्षर माणसाने गावावरून आलेले पत्र वाचून दाखविण्याची विनंती केली. पण ते पत्र वाचून दाखविणे हे त्यांना शक्य नव्हते. याचे वामनदादांना खुप दुःख झाले, लाज वाटली. मोठ्या जिद्दीने त्यांनी आठ दिवसात बाराखडी तोंडपाठ केली आणि वाचायला शिकले. वाचन आणि चित्रपटामुळे त्यांच्यातील कलावंत जागा झाला.

वामनदादा कर्डक यांनी 'छोडो भारत' च्या काळात कवी प्रदिप यांच्या गीताच्या चालीवर स्वतः लिहिलेले एक गीत म्हटले आणि वामन कवी झाले. त्यांच्या गीतांविषयी भाष्य करतांना कॉ.भास्करराव जाधव 'हे गीत वामनाचे' च्या प्रस्तावनेत म्हणतात, "१९५० सालापासून वामनरावांनी चार हजारापेक्षा अधिक कविता, गाणी लिहिलेले आहेत. त्यातील हिंदी गीते वगळता १५००-१६०० गाणी अहमदनगर येथील वामनराव भक्त श्री. माधवराव गायकवाड यांनी संग्रहीत केली आहेत."[१] असे मोठ्या प्रमाणात वामनदादांनी गीत लेखन केले आहे. वामन निंबाळकर यांनी 'वाटचाल' (१९७२), कॉ. भास्करराव जाधव यांनी 'हे गीत वामनाचे' (१९९७) साली त्यांच्या गीतांचा संग्रह प्रकाशित केले. या व्यतिरिक्त वामनदादाचे असंख्य गीते पुस्तकरुपाने अजूनही प्रकाशित झालेले नाहीत.

वामनदादा कर्डक यांना भीमशाहीर म्हटले जाते. आणि आंबेडकर क्रांतीचे लोककवीही ते होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलनाचे त्यांनी चढउतार पाहिले. त्या सर्व आंदोलनाचे घटनाक्रमाने चित्रण त्यांच्या गीतांमध्ये पाहवयास मिळतात. त्याचबरोबर डॉ.आंबेडकरांच्या वेगवेगळ्या कार्यावर कविता व गीते त्यांनी लिहिली आहेत.

"एप्रिल चौदा उगवताच उगवला तारां
लागला या भूमीला नव्या युगाचा वारा"

डॉ. आंबेडकर हे तर वामनदादाचे प्रेरणास्त्रोत होत. आंबेडकरासारख्या क्रांतीसुर्यावर त्यांनी अनेक कविता आणि गीते लिहिले आहेत. वामनदादांच्या प्रतिभेतून साकार झालेले आंबेडकर महाकाव्य होय. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कोणत्याही घडलेल्या घटनेची अभिव्यक्ती करतांना वामनदादा निसर्गाच्या सुंदर प्रतिमांमधून करतात. हे त्यांच्या कविता व गीतामधून जाणवून येते. त्यांनी लिहिलेली गीते मानवी मनाचा वेध घेणारी आहेत. याची जाणिव झाल्याशिवाय रहात नाही. त्यांच्या गीताविषयी भाष्य करताना डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, ‘‘अपूर्व आनंद ! त्याची अभिव्यक्ती वामनदादा निसर्गाच्या सुंदर प्रतिमांमधून करतात. ही बाब जरा बारकाईने लक्षात घेतली तर ही गीते केवळ गीतकाराने लिहिलेली गीते नव्हेत तर एका प्रतिभावंत कवीने ती लिहिली आहेत ही बाब ध्यानात आल्याशिवाय राहत नाही.[२] वामनदादाची गीते विचार अभिव्यक्त करणारे असले तरी त्यामधील त्यांनी उपयोजिलेल्या निसर्गप्रतिमा लक्षात घेण्यासारख्या आहेत. त्यामुळे त्यांची कविता व गीते आदोलनातील सर्वसामान्य माणसांना आपली गीते वाटतात. त्यामधून प्रेरणा घेऊन अनेक मानसे आंदोलन करण्यास प्रवृत्त झालेली आहेत. आंबेडकरांच्या जन्माचा गौरव ते ऐश्वर्यशाली अशा शब्दातून करतात.

‘‘उध्दरली कोटी कुळे
भीमा तुझ्या जन्मामुळे।।
….. झाले गुलाम मोकळे
भीमा तुझ्या जन्मामुळे ।।
बुध्दाकडे जनता वळे
भीमा तुझ्या जन्मामुळे ।।

वामनदादांच्या कविता व गीतातील ओवी सुर्याच्या प्रखर तेजासारख्या तळपतात. त्यामुळे त्या मानवी मनाला सुंदर तर वाटतात पण त्यातील सुभाषितांचे लावण्य वाखण्याजोगे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्माने माणसातील माणुसकीचा सन्मानाला जागृत केले. एका गीतामधून वामनदादा दीनदुबळ्या-पिढीतांच्या भुतकाळाचे चित्रण करतांना अत्यंत प्रभावी शब्दातून सांगतात.

‘‘दूर फेकली होती, ही जनता कोटी कोटी
मिळू दिली ना कोणी, कष्टाची चटणी-रोटी
तरी उपाशी पोटी, संदेश भीमाचा ओठी
खवळून उठली होती, नऊ कोटींची लाचारी।।
विळे कुऱ्हाडी भाले, ना तलवारीचे पाते
तरी जोडले होते, रणमैदानाशी नाते
तुफान उठवीत होते, ते क्रांतीचे उद्‌गाते
करी कुणाच्या नसता, रणवीरापरी तलवारी।।

वामनदादाच्या गीतामधील अविष्कार माणसाला मोठा प्रभावी करणारा आहे. झोपलेल्या समाजाला जागे करुन त्यांच्या अंगावर रोमाच फुलविणारा आहे. पिढ्यान् पिढ्या अस्पृश्य समाजाने भोगलेला तो भुतकाळ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून प्रेरणा घेऊन मनोबलाने दिलेला लढा आहे. वामनदादाच्या गीतांमध्ये डॉ. बाबासाहेबांच्या आचार-विचारांचा हुंकार अभिव्यक्त होताना दिसतो. विशिष्ट वैचारिक भूमिका घेऊन आंबेडकरांनी आंदोलने उभारली होती. ही आंदोलनरुपी लढाई नि:शस्त्राची व निष्ठांवतांची होती. म्हणुनच एका गीतामधून वामनदादा म्हणतात की,

‘‘पाणी महाडचं पेटलं
नाक नासिकचं कापलं

थरथरली वैशाली गं्''

डॉ. बाबासाहेबांनी निळ्या ध्वजाखाली उभारलेली मानवी अधिकाराच्या या क्रांती लढाईला वामनदादा भीमक्रांती म्हणतात. या भीमक्रांतीचा महिमा गातांना ते म्हणतात –

''चारी वर्णाचे काळे करुनी तोंड
उभा विश्वात त्याची काढली धिंड
कराया सुखी सारा आपुला भारत खंड
रक्तविहित झाले भीम क्रांतीचे बंड''

डॉ. आंबेडकरांनी उभारलेली क्रांती ही अस्पृश्याच्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणणारी होती. म्हणुन त्या क्रांतीला वामनदादा जग बदलणारी क्रांती म्हणतात. या भारत भूमीवर सर्वाचा सारखाच अधिकार आहे. पण येथील काही मानवी समुहांनी मातृभूमीपुत्रांना त्यांनी मातृभूमी मिळवून दिली नाही. त्यासाठी डॉ. आंबेडकरांना मोठा लढा उभारुण संघर्ष करावा लागला. या सर्व घटनाक्रमांचे सऱ्हदय वर्णन वामनदादा करतात.

१९५६ साली महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मस्वीकार केला. त्यावेळच्या सामाजिक स्थिती-गतीचे वर्णन करताना वामनदादा एका गीतामधून म्हणतात –

''घडले ते छप्पन साली, क्रांतीची लाट आली
आली ती लाट आली, मुक्तीची वाट झाली''

डॉ. आंबेडकरांची वैचारिक भूमिका सर्वसामान्य माणसाच्या ह्दयापर्यंत पोहचविण्याचे काम वामनदादाचे गीते करतात. हिंदू धर्म मार्तंडानी जातीभेद करुन मानवी समूहाचे विघटन करण्याचे काम केले पण बुध्द धर्म हा ईश्वर मानत नाही. देवाला व दैवाला थारा देत नाही. म्हणून हिंदु धर्माचे अंगातील वस्त्र फेकून द्या आणि बुध्दाच्या समतेची निळी शाल अंगावर घ्या. हा आंबेडकरांचा संदेश वामनदादांनी लोकांना सांगितला आहे.

''द्वेष धाग्यांनी विणलेली जीर्ण जुनी
ठिगळांची अशी वापरावी कुणी
रंग मानवतेचा जिला ना मुळी''

मानवी धम्मात समतेच्या सागरात व दु:खितांच्या शोषितांच्या परिवर्तनाच्या लढ्यात डॉ. आंबेडकरांची वैचारिक भूमिका महत्त्वाची आहे. ज्या मानवी समुहांना समतेच्या राजमार्गावर प्रवास करावयाचा आहे तिथे-तिथे आंबेडकरांच्या मुक्तीमार्गाचा विचार महत्त्वाचा आहे. भीमगीतांच्या गायनात आणि कोटी नयनात वामनदादांना तोच विचार प्रेरणादायी दिसून येतो.

वामनदादांनी बदलत्या सामाजिक स्थितीशी सतत संवाद साधला आहे. वेगवेगळ्या घटनाक्रमांमुळे माणसाने कसे बदलावे हे तर त्यांनी समाजमनाला सांगितले. पण परंपरेची चौकट ज्या भीमविचारांनी मोडून टाकल्या त्याच वैचारिक भूमिकांचे संघटन डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वानानंतर वैचारिक आंदोलन विस्कळीत होऊ लागले. स्वार्थ, अंहकार, क्षुद्रपणा, अप्रमाणिकपणा, बेइमानी या वेगवेगळ्या प्रवृत्तींनी संघटनेचे रुपांतर गट-तटात झाले. आंदोलनाची आग विझली, लोकांचे आर्थिक वर्गानुसार गट तयार झाले. काही शिक्षित लोकांची सुरक्षितेची, सुखवस्तूपणाची भावना अधिक प्रभावी झाली. माणसे अधिक व्यवहारिक विचार करु लागली. त्यामुळे माणसांच्या मनातील आंदोलनाचा, चळवळीचा विचार लोप पावू लागली.

अशावेळी वामनदादा धीरगंभीर होऊन गीतामधून सांगतात.

"काल आई असता कुणी न केले चाळे

तेच विणू लागले आज विषारी जाळे

असे हे आपुले भाई ग बाई"

वामनदादांनी समाजाच्या मिंधेपणावर फटकारे मारायला मागे-पुढे पाहिले नाही. गीताच्या माध्यमातून दगलबाजांना वैचारिक आसुडाचे फटके मारुन झोडपू लागले. स्वतःला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक वारसदार म्हणून नेते मंडळीमुळे प्रमाणिक भीमसैनिकांच्या वाट्याला अगतिक भोगवटा येऊ लागला. त्यामुळे भयंकर स्फोट व्हावा त्याप्रमाणे अस्वस्थता त्यांच्या गीतामधून व्यक्त होते.

"भीम माझ्या मधी होता मान ताठ होती माझी

आज माझ्यातला भीम इथे मीच केला उणा।।

माझ्या आई बहिणीला नागविली ठाई-ठाई

मला चीड येत नाही, मला चीड येत नाही

मीच माझ्या अब्रुची पाही विटंबना।।"

वामनदादांचे गीत म्हणजे जळजळते रसायन आहे. उपरोधात्मक निखाऱ्याचा वर्षाव आहे. त्यांचा जीव तडफडतो. त्यांना स्वतःलाच भाजून-पिंजून काढल्यासारखे वाटते. नव्हे तर शब्द-सुरांच्या आणि भाषणांच्या जंजाळात ते अडकले नाहीत. कृतीशिवाय हे सर्वच बोल केवळ निष्फळ आहे. वैयक्तिक स्वार्थासाठी लोकांनी आंदोलन तोडले. अहंकाराची हत्यारे बळकट केली. विचाराने लहान आसणारी माणसे स्वःला मोठी समजतात. त्यावेळी समाजाचा ऱ्हासाला पर्याय नसतो. अधोगतीशिवाय समाजाच्या वाट्याला दुसरे काहीच येत नाही. पण ज्यावेळी विचाराने मोठी आसणारे माणसे स्वतःला जेव्हा लहान समजून मोठेपणा प्रकट करतात तेव्हा समाजाच्या प्रगतीची वाट कोणीच आडवू शकत नाही. आंबेडकरी समाजात लहान माणसे स्वतःला मोठी समजू लागतात आणि त्यामुळे संघटन शक्ती व समाजशक्तीचा ऱ्हास होण्यास वेळ लागत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवतावादी विचारातून एकता प्रस्तापित केली. ती एकता तोडणे म्हणजे आंबेडकर विचार तोडणे, आंदोलन तोडणे म्हणजे भीमाचा गळा कापणे. समाजाशी बेइमानी करणे म्हणजे भीमाशी बेइमानी करणे होय. समाजाच्या नावार माया (पैसा) जमवणे म्हणजे भीमाचा गळा कापणे होय हे वास्तववादी विचार वामनदादा गीतामधून सडेतोडपणे व्यक्त करतात.

"पीक नाही अरे हा भीमाचा गळा

कापशी काय रे, का रे झाला खुळा"

वामनदादाकडे सच्ची आंबेडकर निष्ठा होती. त्यामुळे अलिकडील काळात आंबेडकरनिष्ठेचा प्रश्नांचा सुळसुळाट झाला आहे. वेगवेगळ्या कारणांमुळे संघटनेचे तुकडे पडले आहेत. ती संघटनेची तुकडे राजकीय पक्षाच्या श्रीमंताघरी पाणी भरु लागल्या आहेत. या सर्व गोष्टीमुळे वामनदादांचा जीव तगमगत आहे. याची जाणिव त्यांच्या गीतामधून झाल्याशिवाय रहात नाही.

आंबेडकरवादी समाजानेच नाही तर संपूर्ण बहुजन समाजाने वामनदादांच्या गीतामधून व्यक्त झालेले खडे बोल हृदयावर कोरुन ठेवावेत. त्यांचे स्तोम किंवा बारीकरण करण्याची गरज नाही. समाजात ऐकी नसेल तर हजारो लोक असून नसल्यासारखे आहे आणि भीमाच्या मताने पाच लोक कुठे आहेत? पाच लोकांची तोंडे पाच दिशांनी वळलेली आहेत, म्हणूनच आंदोलनाची तलवारच वाकुन गेली आहे. हे संपूर्ण भीमवैचारिकते वास्तव अनुभव वामनदादा गीतातून अभिव्यक्त करत असले तरी त्यांनी काही गीतामधून बुध्द-फुले-आंबेडकर ही विचारपरंपरा मांडली आहे. त्यांनी गीतातून लिहिले आहे.

"बुध्दानंतर फुले, फुलेचा चेला आंबेडकर
क्रांती क्रांती करीत फिरला अखंड भारतभर"

व

"भीम-फुले माणसाला भेटला
माणसाचा लढा आज पेटला"

अशी समाजक्रांतीची परंपरा वामनदादा रेखीवपणे गीतातून मांडतात. क्रांतीकडे घेऊन जाणाऱ्या सामाजिक अभिसरणाची पायाभरणी ते करतात. त्याचबरोबर म. फुल्यांचा माणुसकीचा दृष्टीकोन मांडण्यास वामनदादा विसरलेले नाहीत, म्हणूनच वामनदादांविषयी लिहिताना डॉ. यशवंत मनोहर म्हणतात की, "वामनदादा हा विशाल मनाचा, पिकल्या स्वभावाचा, अचूक दिशा घेणारा आंबेडकरवादी गीतकार आहे"[3] समाजामध्ये सामाजिक समता प्रस्तापित होण्यासाठी ज्या-ज्या समाजधुरीतांनी काम केले. त्या-त्या क्रांतीमानवाची कार्यरेषा वामनदादांनी रेखाटली आहे. छत्रपती शाहू महाराज, अण्णाभाऊ साठे यांच्यावरही त्यांची सुंदर गीते आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील शूद्र, अतिशुद्र, आदिवासी, भटके-विमुक्त, मुस्लिम, ख्रिश्चन स्त्रियाइत्यादी सर्व दुःखीतांना उत्थांनाचा मार्ग दाखविला. हे सर्व वामनदादांच्या प्रतिभेने टिपले आहे. आणि तेच आंबेडकर विचार त्यांनी गीताच्या माध्यमातून शब्दात बांधण्याचा प्रयत्न केला आहे. नव्हे तर वामनदादांच्या गीतामधून एक स्वच्छ आंबेडकरवादी जीवनदृष्टी व्यक्त होताना दिसते. तिच्यातील विसंगती गढूळ पाणी कुठेय मिसळतांना दिसून येत नाही. अंतर्विरोधाच्या कातरीत वामनदादा सापडू शकत नाहीत. त्यांनी अंतर्विरोधाचे विसर्जन केले आहे. ते स्वच्छ प्रसारपंथी झालेले आहेत. उजेडाचे सोबती व परिवर्तन चळवळीचे सारथी ते आहेत. आपल्या गीत लेखनामागील हेतू ते सांगतात –

"माणसा इथे मी तुझे गीत गावे
असे गीत गावे तुझे हित व्हावे"

वामनदादांच्या गीतांचा विषय मानव आहे. माणूस त्याच्या दुःखातून मुक्त व्हावा. हे बुध्दाचे विचार त्यानी आपल्या गीतांच्या शब्दातून पेरले आहे. बुध्दाला दिसावे तसे जीवनाचे सुंदरत्व त्यांना दिसले आहे.

आंबेडकरी समाजवादी विचारांनी वामनदादांचे गीते ओतपोत भरले आहेत. त्यांच्या गीतातील भव्यता आणि मनाला उन्नत करण्याची शक्ती आपला पाठलाग करते. नवी क्रांतीची जाणिव देणारी त्यांची गीतरचना आहे तसेच आंबेडकरवादी कवितेचा जाहीरनामाच पेश करतात. हा जाहीरनामा आंबेडकर संस्कृतीच्या प्रत्येक घटकाची ठरतो. आंबेडकरवादी गीतकारांचा, कवीचा आणि व्यक्तीचाही हा धम्म आहे. तीच त्यांची जीवनशैली आहे. याचसाठी त्यांचा अट्टाहास आहे. "जळू परंतू धरती उजळू, प्रकाश येथे असाच उधळू" ही प्रतिज्ञा, हे ध्येय, हा वसा आणि ही प्रतिबध्दताच मोठी मोहक आहे. आपल्या सर्व क्रांतीगीतांची कुळकथा वामनदादांनी गीतात सांगितली आहे.

"भीमवाणी पडली माझा कानी
तीच वाणी ठरली माझी गाणी"

वामनदादांनी डॉ. बाबासाहेबांच्या वाणीची गाणी केली. म्हणून "इथे गीत वामन खरे तेच गाई" हे मान उचांवून वामनदादा सांगत आहेत. साधे व जीवंत शब्द अस्सल निष्ठा, लोकांशी नाते, उत्कंट संवेदनशीलता, मन आणि बहुजनहिताय सर्जनशीलता यामुळे वामनदादांच्या गीतात गोडवा फुलतो. काव्याच्या मधाने गीत थबथबत राहते. वामनदादाचे गीत म्हणजे मधाचे पोळ होय. त्यांचे गीत

ऐकतांना पाणीही चालू लागते, धावू लागले. त्यामध्ये गतीमानता निर्माण करते. नव्या उमेदी, नवा उत्साह निर्माण होतो. पाण्याची वाटचाल सुरु होते. वामनदादांच्या गीतामधील धावणारे पाणी म्हणजे समाज होय. कालपर्यंत पाण्यासारखा थांबलेला पण या गीतांमधील ऊर्जा घेऊन धावायला लागलेला समाज म्हणजे पाणी. त्यामध्ये नवशक्तींचा संचार होतो. ही पाण्याने वामनदादांच्या गीताला कृतीची दिलेली दाद आहे. वामनदादांना टाळ्यांच्या रुपात गीतांना दाद नको आहे. किंवा टाळ्यांची दाद मिळण्यासाठी ते गीतरचना करत नाहीत ते गीते लिहितात पाणी रुपी जीवन गीतमान व्हावे यासाठी समाजाला गतीमानतेचे अंलकृत होता यावे यासाठी तसेच वंचित, भटके लोकांचे सर्व दुःख गळून जावे यासाठी आहे.

वामनदादाचे गीत भिक्खूची भूमिका घेणारे गीत आहे. ‘‘चरथ भिक्खवे चारिकं बहुजनहिताय, बहुजनसुखाय’’, बहुजनांच्या उन्नयासाठी भिक्खूने फिरत रहावे. त्याप्रमाणे वामनदादांचे गीत देशभर फिरत रहाते. नव्हे तर ती एक वामनदादांची एक जन्मप्रतिज्ञा आहे. ती त्यांची प्रतिज्ञा एक सुंदर प्रतिभा ही त्यांची एक वाक्यता होते, म्हणूनच –

‘‘ही वामनची लेखणी, की दिसू नये देखणी
फेकून लक्तरे जुनी नेसली नवी पैठणी
चवदार तळी न्हाऊन आली, अशी ही जय भीमवाली’’

वामनदादांच्या गीतांना लावण्य लाभले आहे. जुने परंपरेने चालत आलेले पूर्णपणे फेकून देऊन त्यांचे गीते नवतेने मोहोरुन आले आहेत. म्हणून त्यांची गीते देखणे आहेत. वामनदादांच्या गीतामधील उपमा, उपरोध हा माणसाला थक्क करणारा आहे. जीवंत राहणे ते लोकांच्या गाण्याखातर आणि मरायचे तेही लोकांच्या गाण्याखातरचं. याही अर्थाने वामनदादा लोककवी आहेत. लोकांच्या भाषेतून, लोकांना मनुष्यत्वाच्या मार्गाने नेण्याऱ्या, लोकांच्या हितासाठी, लोकात राहून लोकनिष्ठ लेखन करणारा लोककवी वामनदादा होय. लोकशाहीर वामनदादा केवळ गीतांना जन्म घालित नाहीत तर स्वच्छ, कणखर आणि बुलंद आवाज ही वामनदादांची आगळी-वेगळी श्रीमंती आहे. मुस्लिम बांधव नमाजासाठी गुडघे टेकून बसतात. त्याप्रमाणे वामनदादा गाण्यासाठी बसत होते. त्यांच्या मुखातून शब्दांचे आणि सुगंधी अर्थाचा उजेड धावत राहत होते. वामनदादा हे लोककवी आहेत. त्यांनी मानवतावादी दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन अनेक गीतरचना केलेली आहे. त्यांची गीत लिहिण्याची स्वतंत्र अशी पध्दत असून व्यवहार भाषेत गीत लिहितात. वामनदादा गीतांमध्ये अनेक सुभाषित आहेत त्याचप्रमाणे उत्कंट, तीव्र, धारदार, रोखठोक शब्दांचे उपयोजन त्यांनी गीतामध्ये केलेले आहे.

**सारांश :**

वामनदादा कर्डक हे मानवतावादी लोकगीतकार असून ते महाराष्ट्राच्या आणि देशाच्या परिवर्तनवादी गीतांचे दिशादर्शक आहेत. मानवी परिवर्तनाच्या गर्दीत त्यांची गीते जशी फुलली तसे इतर कोणा मराठी गीतकारांच्या संदर्भात झाल्याचे दिसत नाही. वामनदादांची गीत गायनातील ताल-सुरांवरची पकड, शब्दवरची हुकुमत, रचनेवरचा लगाम या सर्व गोष्टीसोबत समाजजीवनातील क्रांतीच्या जाणिवांशी नाते यांचा एकत्रित विचार केला तर वामनदादांनी आपल्या गीतामधून वर्ग आणि वर्ण जाणिव पेरत ठेवली. ही किमया तशी कोणा मराठी गीतकाराला शक्य झाली आहे असे वाटत नाही. या दृष्टीने वामनदादा कर्डक इतर गीतकारापेक्षा कितीतरी सजग, मानवतावादी मोठे गीतकार आहेत. तसेच स्वच्छ आंबेडकरवादी जीवनदृष्टी देणारे महागीतकार आहेत याकडे कानाडोळा करुन चालणार नाही.

**संदर्भ ग्रंथ :**

१) प्राचार्य डॉ. प्रकाश कुंभार - दलित साहित्य : काही विचार काही दिशा, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
२) भालचंद्र फडके - दलित साहित्य वेदना व विद्रोह, श्री विद्या प्रकाशन.
३) (संपा.) अर्जुन डांगळे - दलित साहित्य : एक अभ्यास, सुगावा प्रकाशन.
४) बाळकृष्ण कवठेकर - दलित साहित्य एक आकलन, विजय प्रकाशन.
५) डॉ. यशवंत मनोहर - आंबेडकरवादी महागीतकार वामनदादा कर्डक, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर (२००५).